मराठी

नोव्हेंबर-डिसेंबर २०११

# चैतन्य लहरी



* सर्व शक्त्या भौतिक स्तरावरसुद्धा शक्तिशाली आहेत ...४





पूजा केल्यामुळे
आदिशक्तीची सर्व
(सात) चक्रे जागृत
होतात तसेच
या चक्रांद्वारे
ती आपले
कार्य सुरू करते.
सृष्टीमध्ये प्रथमच
अशाप्रकारचा
अवतार
झाला आहे.

**कृपया लक्ष द्या :**

२०१२ च्या सर्व अंकांची नोंदणी सप्टेंबर २०११ ला सुरू होऊन ३० नोव्हेंबर २०११ ला समाप्त होईल.

# सर्व शक्त्या

## भौतिक स्तरावरसुद्धा शक्तिशाली आहेत



आपल्याला पूजेचीसुद्धा आवश्यकता आहे. आपण यामुळे खरोखरच गहनतेत जातो. आजचा दिवस श्री महालक्ष्मी पूजेच्या रात्रीचा आहे. केवळ श्री लक्ष्मी पूजेचा नाही, दोन्हीमध्ये फरक आहे. श्री महालक्ष्मी, श्री आदिशक्तीच्या तीन शक्त्यांपैकी एक आहे. श्री महालक्ष्मी, श्री महासरस्वती आणि श्री महाकाली. या सर्व शक्त्या भौतिक स्तरावरसुद्धा शक्तिशाली आहेत आणि सूक्ष्म स्तरावरदेखील, म्हणून आपण विचार करतो की श्री लक्ष्मीची शक्ती प्राप्त झाल्यानंतर श्री महालक्ष्मी शक्ती प्राप्त होते. श्री लक्ष्मी.....इथे श्री लक्ष्मीच्या आठ शक्त्या आहेत.

हॅमस्टेड, यू.के,
११.९.१९८०,

या श्री लक्ष्मीचा जन्म सागरातून झाला. मोठ्या सागरातून झाला. हजारो वर्षापूर्वी जेव्हा समुद्रमंथन झाले, तेव्हा श्री लक्ष्मी समुद्रामधून बाहेर आल्या कारण त्या समुद्राची मुलगी आहेत, त्यामुळे त्यांना नीरजा म्हणतात. 'नीर' म्हणजे पाणी आणि 'ज' म्हणजे जन्मलेल्या. हजारों वर्षापूर्वी हे कार्य झाले आणि त्यांनी जन्म घेतला. तर त्या कोण आहेत? ही लक्ष्मी कोण आहे? प्रतीकात्मक रूपाने पाहिले तर कोणत्या गोष्टीची अभिव्यक्ती आहे? हे चेतनेचे, जाणिवेचे प्रकटीकरण आहे. आपल्याला माहीत आहे, की त्यांचा जन्म सागरामधून झाला. सर्वप्रथम चेतना समुद्रातून विकसित झाली. जीवनाची सुरुवात समुद्राने झाली आणि विकास (चेतनेचा) समुद्राच्या बाहेर झाला. जिवंतपणाशिवाय चेतनेचे अस्तित्व नाही कारण जीवनाशिवाय....जिवंतपणाशिवाय सर्व काही जड स्वरूपात आहे. जड-व्याख्या जीवनाचा भवसागर. सर्व काही मृतवत,



विवेकहीन, चेतनाहीन, सर्व काही मृत स्वरूपात, मात्र जीवन मिळाल्यावर चेतना जागृत होते. चेतनेची सुरुवात सागरामधून झाली. हे प्रतीकस्वरूप प्रकटीकरण आहे, परंतु आपण एकूण सर्व जमेस धरून ढोबळमानाने जाणतो, परंतु सूक्ष्म स्तरावर मार्ग चक्राकार, गोलाकार, परिघाप्रमाणे आहे. स्थूलदृष्ट्या ते प्रतीकस्वरूप आहे. खरे पहाता आपण प्रतीकात्मक म्हणतो. हा मुद्दा लक्षात आला कां? कारण प्रतीकात्मक रूपात पाहिले तर जीवनाची सुरुवात समुद्रामधून झाली आणि ती चेतनास्वरूप जाणिवेत आली. माझ्यासाठी हे प्रतीकात्मक स्वरूप आहे आणि तुमच्याकरिताही प्रतीकात्मक आहे. दुसऱ्या

बाजूने पाहिले तर चक्राकार, गोलाकार. मला वाटते की मी काही पाहिले, काही या बाजूने पाहिले, तुम्ही त्या बाजूने बघा. या मार्गाने बघा. आपल्याला काय समजले? आपण काहीतरी रंगीत बनवावे असे आपल्याला वाटते. कोणत्या तरी काचेवर आपण रंग कसा देणार? आपल्याला कल्पना आहे का? आपण प्रथम बाहेरून रंग देण्यास सुरुवात करणार. उदा.आपल्याला देवीला रंग द्यायचा आहे, तर आपण प्रथम तिच्या दागिन्यांना रंग देणार, नंतर वस्त्र, त्यानंतर शरीराला रंग देणार. अशाप्रकारे ते प्रथम आतल्या बाजूस, या बाजूस जाईल. जेव्हा आपण काचेला रंग देऊ तेव्हा त्याला प्रथम दुसऱ्या बाजूने पहावे लागेल, परंतु कोणत्यातरी मजबूत कॅनव्हासवर रंगीत चित्र रेखाटायचे असेल तर आपण प्रथम बाहेरची बाजू, गोलाकार बाजूने पेंटींगची सुरुवात करतो. प्रथम शरीराला रंग, नंतर साडी शेवटी दागिने रंगवणार, म्हणून एक गोष्ट प्रतीक स्वरूपात आहे कारण विचार करावा लागतो, की कोणत्या विशिष्ट दृष्टिकोनामधून दुसऱ्या माणसाला, दुसऱ्याच्या दृष्टिकोनातून पाहिले तर हे पूर्णपणे प्रतीकस्वरूप आहे आणि आपल्याला आश्चर्य वाटेल की प्रत्येक गोष्ट प्रतीकात्मक आहे. सूक्ष्म, नेहमी सूक्ष्मच असणार आणि जे ढोबळ स्वरूपात आहे ते ढोबळच राहणार.

त्यांचा जन्म समुद्रातून झाला, त्यांना नीरजा म्हटले गेले. 'नीर' म्हणजे पाणी. माझे नावदेखील नीरा आहे. आपल्याला माहीत आहे. 'निर्मला' शब्दातला एक भाग नीरा आहे. नीमा आणि निला. अशाप्रकारे माझी तीन नावे आहेत किंवा मी म्हणते चार नावे आहेत आणि मोठे नाव 'निर्मला' आहे. तर नीराचा अर्थ कोणता?......त्यांचा जन्म सागरातून झाला. 'मेरी' चे नाव सुद्धा 'मरियम' किंवा 'मेरी'. मला माहीत नाही तुम्ही इंग्रजीत कसे उच्चाराल? पण मरिया शब्द 'मेरी' मधून उद्‌भवला आहे. शब्द 'मरी'. मरी शब्द मेरीमधून आला म्हणून महालक्ष्मीला 'मेरी' नाव दिले गेले कारण तिचा जन्म सागरामधून झाला. म्हणून तिला 'मेरी' म्हटले गेले. काहीजण 'मरियाना' म्हणतात. काही 'मिरियम' म्हणतात. या सर्व शब्दाचा एकच अर्थ आहे, इशारा आहे, की त्यांचा जन्म सागरामधून झाला, म्हणून त्या 'महालक्ष्मी' आहेत. म्हणून 'मेरी' महालक्ष्मी संबोधतात आणि श्री गणेश बालक. तुम्ही बघा हे सर्व कसे प्रतीकरूपात कार्यरत केले आहे. केवळ फक्त दिवाळीलाच श्रीलक्ष्मी आणि श्रीगणेश यांची पूजा करण्यात येते. या दोन अवतरणांची. आपण ही गोष्ट समजू शकतो का?

माझ्यामते 'मेरी' श्रीमहालक्ष्मीचे प्रतीक आहे. तुमच्यासाठी श्रीमहालक्ष्मी प्रतीक आहे. परंतु बाह्यरूपात श्रीइसामसीह श्रीगणेशाचे प्रतीक आहे. ते श्रीगणेश प्रतीक आहे. त्यामुळे दोघांचे पूजन दिवाळीत केले जाते. खरे पहाता, श्रीइसामसीह यांचा जन्मदिवस ख्रिसमस आहे. इसामसीह यांचा खरा जन्मदिवस प्रथम होता आणि यावेळी बालक इसामसीह यांचा जन्म झाला. २५ डिसेंबरला

नाही. हा एक समज आहे. काहीही असो, चालू राहू द्या. कोणताच फरक पडणार नाही. केव्हाही असो, यावेळी मोठा उत्सव होता. या उत्सवानंतर जन्म झाला. याला 'वलानन' म्हणतात. मला माहीत नाही आपण याला काय म्हणता? यावेळी या बालकाचा जन्म झाला. हीच वेळ होती ज्यावेळी इसामसीह यांचा जन्मोत्सव ख्रिसमस साजरा झाला. इसामसीह यांच्या जन्मदिवसाचा संबंध दिवाळीशी आहे. परंतु कोण जाणे कसा काय जन्मदिवस पुढे ढकलला गेला. कदाचित याला पुढे ढकलण्याचे काही पुरावे आपल्याला मिळू शकतील.

योगी म्हणतात, ही गोष्ट माहीत आहे. श्रीमाताजी म्हणतात, प्रतीकात्मक रूपात या जीवनात कलियुगातसुद्धा हे घडलेले आहे. श्रीमहालक्ष्मी आणि श्रीगणेश यांचा जन्म झाला होता. यामुळेच यांची पूजा केली जाते. आपण कोणालाही विचारा की दिवाळीच्या दिवशी श्री गणेश व महालक्ष्मी दोघांची पूजा का करण्यात येते? ही अतिशय अंधारी रात्र होती आणि आकाशात एक तारा चमकत होता. रात्र काळोखी असल्याने सर्वांनी हा तारा पाहिला. थंडगार वातावरण आणि काळोखी रात्र होती. म्हणूनच दिवाळीचे प्रतीक सर्व सहजयोग्यांकरिता अत्यंत महान आहे.

सर्वप्रथम आपण हे जाणून घेतले पाहिजे की दिवाळीचा सण चार दिवस साजरा केला जातो, परंतु महाराष्ट्रात आणखी एक दिवस वाढवण्यात आलेला आहे. दिवाळीच्या पहिल्या दिवसाला 'धनत्रयोदशी' म्हणतात. कृष्ण पक्षामधील हा तेरावा दिवस असतो. हाच तो दिवस आहे, ज्या दिवशी श्रीलक्ष्मीचा जन्म झाला होता. याचा अर्थ असा आहे, की त्यांचा जन्म श्री गृहलक्ष्मी....गृहिणीच्या रूपात झाला. आठ लक्ष्मी आहेत. याचा अर्थ मी नंतर सांगते. गृहलक्ष्मी त्यांच्यापैकी एक आहे. श्री गृहलक्ष्मी प्रथम स्वरूप श्री लक्ष्मीचे आहे. त्यांचा जन्म श्री गृहलक्ष्मी स्वरूपात झाला. याचा अर्थ असा आहे, की मानवी चेतना विकसित होण्याचा आरंभ वास्तविक पहाता तेव्हा झाला की जेव्हा त्यांनी कौटुंबिक जीवनाची सुरुवात केली. तोपर्यंत माणूस एकटाच रिकामटेकडा स्वच्छंदीपणाने फिरत होता. तसेच चेतनासुद्धा पशूंप्रमाणे होती. जरी तो माणूस बनला तरीही पशूप्रमाणे होता. कौटुंबिक जीवनाची सुरुवात झाल्यानंतर श्री गृहलक्ष्मीने आपले कार्य सुरू केले आणि अशाप्रकारे श्रीगृहलक्ष्मी अवतरणाची अनुभूती आली. जन्म घेणारी ही पहिली लक्ष्मी होती. म्हणून तेरावा दिवस श्री गृहलक्ष्मीचा आहे. गृहिणीचा आहे. लोक बाजारातून खाण्याच्या वस्तू बनविण्याची भांडी इत्यादी खरेदी करतात. हा गृहिणीचा दिवस आहे. म्हणून श्री लक्ष्मीपर्यंत

**श्री लक्ष्मीपर्यंत पोहोचण्यास समजले पाहिजे की मातृत्व फारच महत्त्वाचे आहे.**



पोहोचण्यास समजले पाहिजे की मातृत्व फारच महत्त्वाचे आहे. गृहलक्ष्मीच्या रूपात मातृत्व फार महत्त्वाचे आहे.

दुसरा दिवस यापेक्षाही महत्त्वाचा आहे कारण या दिवशी नरकासुर राक्षसाचा वध केला गेला. नरकासुर भयंकर राक्षस होता. वास्तविक पहाता त्या दिवशी खूप राक्षसांचा वध झालेला होता. हा दिवस राक्षसांच्या वधाचा आहे. या राक्षसांना नरकात टाकले जाते. चौदाव्या दिवशी त्यांना नरकात ढकलले जाते, म्हणून या दिवसाला 'नरकचतुर्दशी' नाव दिले गेले. या दिवशी नरकाचे



दरवाजे उघडे असतात. सहजयोग्यांना या रात्री गाढ झोप घेतली पाहिजे कारण सर्वप्रकारच्या तांत्रिक विद्या या दिवशी करण्यात येतात.

पंधरावा दिवस हा घनघोर अंधाऱ्या रात्रीचा आहे. अमावस्येची रात्र. या दिवशी दिवाळी साजरी केली जाते. भारतात या दिवशी श्रीराम अयोध्येस परत आले होते. प्रतीकात्मक स्वरूपात त्यांचा राज्याभिषेक केला गेला होता. म्हणून दिवाळीचे महत्त्व असे आहे, की या दिवशी नरकासुराचा वध करून त्याला नरकात टाकले गेले आणि त्यानंतर सुरक्षित होऊन उत्सवाचा आनंद साजरा केला गेला हाच दिवस होता जेव्हा इसामसीहचा जन्म झाला, त्यामुळे या रात्री दिवे लावण्यात येतात कारण त्यांचा जन्म रात्री बारा वाजता झाला.

याच्यानंतर भारतात महाराष्ट्रातले लोक उत्सव साजरा करतात. हा प्रतिपदेचा दिवस आहे. या दिवशी आमच्या आईचे पूर्वज शालिवाहन यांनी नववर्षाचा आरंभ केला. म्हणून प्रतिपदेच्या दिवशी नववर्ष पाडवा मानला जातो. प्रतीकात्मक रूपात पाहिले तर इसामसीहच्या जन्माच्या आधीच्या दिवशी नववर्ष साजरे करण्यात येते. त्याच्या जीवनानंतर लगेच नववर्षाचा प्रारंभ होतो. भारतातील ज्या प्रदेशात शालिवाहनांचे राज्य होते तिथे या दिवशी नववर्ष साजरे करतात. शालिवाहन माझे पूर्वज होते. शालिवाहन वंश. पुष्कळ वर्ष याचे भारतात राज्य होते. प्राचीन काळात पुराणातही याचे वर्णन आहे की युद्धात यांनी श्रीकृष्णाला मदत केली होती. शालिवाहनाची सर्व कथा आपल्याला माहीत आहे. नववर्षाचा आरंभ झाला म्हणून आपण सर्व सहजयोगी लोकांचेसुद्धा हेच नववर्ष आहे. आपल्याला हे स्वीकृत करावे लागेल. आपली आई त्याच वंशातील आहे. सांगायचे असे आहे, की तुमच्यावर जबरदस्ती नाही, पण तुम्हाला पाहिजे असेल तसे करू शकता.

नंतर दुसरा दिवस तो सुद्धा खूपच महत्त्वाचा आहे. हा चंद्राचा दिवस आहे. यादिवशी चंद्र समुद्रातून बाहेर आला. पौराणिक गोष्ट अशाप्रकारे आहे, की श्री लक्ष्मी सागरामधून निघाली आणि तिच्याबरोबर चंद्रदेखील बाहेर आला. हा चंद्र फक्त दोन दिवसांचा होता. दोन दिवसाचा द्वितीयेचा नवीन चंद्र. या चंद्राला लक्ष्मीचा भाऊ समजण्यात आले कारण एकाचवेळी दोघांचा जन्म सागरातून झाला म्हणून त्याला श्री लक्ष्मीचा भाऊ म्हणतात. हे सर्व प्रतीक स्वरूपात मानले गेले आहे. चंद्र तर मामा आहे. तो आपलाही मामा आहे. मोठी मजेशीर गोष्ट आहे. कारण मामावर आपला विशेष अधिकार असतो. आपण नेहमीच त्याची मदत घेऊ

शकतो. समुद्रमंथनातून निघालेले विषदेखील श्री शिवजींनी प्राशन केले. म्हणून त्यांनी आपल्या डोक्याला शांत, शीतल बनविण्यासाठी चंद्राला आपल्या माथ्यावर धारण केले. जर आपण पाहिले तर सोमवार चंद्राचा दिवस आहे आणि सहस्राराचादेखील.

श्री सदाशिवांनी चंद्राला डोक्यावर धारण केले. यामुळे लोक पुरुषांची थट्टा करतात. म्हणतात 'तुझा मेहुणा (बायकोचा भाऊ) तुझ्या डोक्यावर बसला आहे.' हे सर्व प्रतीकात्मक आहे. हा बायकोचा भाऊ पुष्कळ महत्त्वाचा आहे आणि तो जर कशाने तरी कोणत्या कारणाने रागवला तर श्री सदाशिवांनादेखील पुन्हा विचार करावा लागतो. सर्वसामान्यपणे हे खास नाते मानले गेले आहे. हे नाते अतिशय माधुर्याचे आणि त्यात खूप अभिव्यक्ती, प्रकटीकरण आहे आणि आपल्याला हे समजले पाहिजे की तो बायकोचा भाऊ (मेहुणा) थट्टामस्करी करणारा आहे. अगदी लहानशी गोष्ट-हा पत्नीचा भाऊ-जेव्हा आपल्याला पत्नीला आनंदी ठेवायचे आहे तर-ही शक्ती आहे. आपल्या मेहुण्याला खूष ठेवावे लागते. म्हणून असे म्हटले जाते की त्याला डोक्यावर बसू द्या. त्याला तिथेच ठेवा. जर तो थट्टा मस्करी करणारा लहान मुलगा असेल तर त्या थट्टामस्करी करणाऱ्या मुलाचे काय करणार? त्याला तो हलणार नाही अशा कोणत्यातरी बाहेरच्या जागेत ठेवले जाते. आपण त्याला बाहेरच्या जागी ठेवतो, पण तो श्री सदाशिवजींचा लाडका, आवडता आहे. सर्व बहिणी त्या दिवशी द्वितीयेला त्याची पूजा करतात. ही महत्त्वाची गोष्ट आहे. रक्षाबंधनाच्या दिवशी आपल्या इच्छेचे प्रतीकात्मकरीत्या प्रकटीकरण केले जाते. तिचा भाऊ चांगला व्हावा आणि बहिणी त्याची (ओवाळणी) पूजा करतात आणि त्याची आरती केली जाते. भाऊ लहान वयाचा असेल तर चांगल्यातऱ्हेने त्याला स्नान घालून त्याला नवीन वस्त्र, कपडे इ.देण्यात येतात. त्याच्यासाठी खास भोजन बनविले जाते. पतीच्या आधीच त्याला जेवण दिले जाते. वास्तविक बघता प्रथम पतीला जेवण देण्याची पद्धत आहे, पण याला या दिवशी प्रथम जेवण देण्यात येते. तो जिजाजींची थट्टामस्करी करतो. हा कार्यक्रम मोठा मजेशीर असतो. याला भाऊबीज म्हणतात. यादिवशी भाऊ बहिणीला काही ना काही भेट स्वरूपात देतो. तुम्ही (बहिणी) यादिवशी त्याला काहीही देऊ शकता. जर आपल्याजवळ कोणतीही मोठी वस्तू नसेल तर छोटी वस्तूदेखील देऊ शकता, परंतु आपले प्रेम दर्शविण्यासाठी काही तरी बहिणीला द्यावयाचे आहे आणि या आजच्या (भाऊबीजेच्या) दिवशी आपल्याला हे करावयाचे आहे. हे करणे खरोखर छान आहे. या दिवशी सर्वांनी एकत्र असावे, पण गृहलक्ष्मीसाठी भाऊ महत्त्वाचा आहे आणि भाऊ-बहिणीचे नाते हे सहजयोगात सामूहिकतेच्या आधार स्वरूपात आहे. आपल्याला माहीत आहे की बहीण-भाऊ यांचे प्रेम हे अत्यंत शुद्ध प्रेम आहे. त्यामध्ये कोणतीही हाव नाही, फक्त प्रेम.....प्रेम घ्यायचे आहे...द्यायचे आहे. या नात्यातले पूर्ण पावित्र्य वाढवायचे आहे.

आपण याला सहजयोगातले भाऊ-बहिणीचे नाते म्हणून ओळखतो. याच्यामध्ये पूर्ण समजूतदारपणा आहे. अगदी पूर्ण सामंजस्य पूर्ण कुटुंबात आहे. प्रत्येकाला समजले पाहिजे की आपण एका कुटुंबातले सदस्य आहोत. एका आईचीच लेकरे आहोत. कोणामध्येही भांडणतंटा, वाद-विवाद काहीही नाही. कोणालाच मोठेपणा, दिमाख दाखवायचा नाही. कोणालाच दुसऱ्यांच्या चुकाही सुधारावयाच्या नाहीत. यामध्ये मी कोणी वेगळा आहे असे कोणीही म्हणत नाही. सर्वांनी एकत्रित सामूहिकतेत कामे करून एकत्रित परिणाम, अगदी मैत्रीचे, सलोख्याचे संबंध ठेवून कामे करावयाची आहेत. मतैक्य आणि पूर्ण सुसंवाद ठेवावयाचा आहे. जो कोणी स्वत:ला वेगळा समजेल तो बाहेर फेकला जाईल. सहजयोगात तो निकामी असेल. पूर्णपणे बिनकामाचा असेल. सर्वांनी एकमेकांना मदत करावयाची आहे. कोणीही कोणाशी मोठमोठ्याने बोलणे योग्य नाही. कोणावरही राग नको. प्रत्येकावर विश्वास ठेवायचा आहे. परंतु कोणाच्याही चुका शोधायच्या नाहीत. प्रत्येकाने प्रेमाने व आदरपूर्वक रहायचे आहे.

सहजयोग्यांसाठी ही मोठी महत्त्वपूर्ण व समजून घ्यायची गोष्ट आहे. आपण सर्व संतमाणसे असून एकमेकांचा आदर केला पाहिजे. उदा.कोणावरही शंका नसावी. अगदी बिलकूल नको. हे करणे मान्य नाही. हे करणे याचा सक्त निषेध आहे. हे मान्य नाही. दुसऱ्यांबद्दल शंका घेणे योग्य नाही. आपण सावध रहावे. मी सांगते की एका गालावर जर कोणी थप्पड मारली तर दुसरा पुढे करा. कोणाच्याही बाबतीत टीका अथवा कोणाच्याही विरोधात बोलू नये. कोणालाही पाण्यात पाहू नये. आपण सर्व संतजन आहोत हे आपण का समजू शकत नाही? आपण संतांचा अनादर कसा करणार? आपण 'परमेश्वरी माणसे' आहोत. आपण हे समजलात का? आपण कोणालाही खाली कसे ठेवणार? आपण 'ते ठीक नाही' आणि 'हे ठीक आहे' असे कसे बोलू शकतो? जर आपण असे म्हणू लागलो, तर दुसरे लोक गैरफायदा उठवतील आणि आपल्याला हाकलून देतील आणि आपण मोठ्या संकटात सापडू. अशा चुकीच्या कल्पनेच्या जाळ्यात कधीही जाऊ नका. जर आपण दुसऱ्यांसाठी चांगले केले तर तुमच्यासाठी इतर लोक चांगलेच करतील. जो चांगले करण्याची सुरुवात करणार नाही, तर ते मोठे हानीकारक आहे. इथे एक दुसऱ्यांशी चढाओढ करायची नाही. सहजयोगात स्पर्धा करण्याच्या कल्पनेचाच त्याग करावा. आपण भाऊ-बहीण आहोत. आपल्याला एकमेकांना मदत करावयाची आहे. सहजयोग द्यायचा आहे. जो खालच्या स्तरावर, अयोग्य पद्धतीने घसरत असेल तर त्याच्यासाठी 'शू बीट' करा. जर कोणी विचार केला की मी अगदी स्वच्छ, नीटनेटका आहे, महान आहे, तर तो जवळच्या वृक्षावर स्वत:च लटकून राहील. कधीकधी मला असे वाटते की याबाबत मोठी भांडणे चालू आहेत. जर कोणी विचार केला की मला घाणीत रहाण्याचा हक्क आहे, तर त्याला जवळच्या वृक्षावर लटकावे लागेल. त्याला समजले पाहिजे की आपापसात एकमेकांचा आदर करावयाचा आहे. तो जर

नसेल तर या नात्याला काही अर्थ नाही. हे अतिशय चांगले व माधुर्याचे नाते आहे. त्यामध्ये आपण दुर्भाग्याने आनंद घेऊ शकत नाही, पण भारतात हे सर्व आपल्याजवळ आहे. आपला भाऊ आपल्यासाठी जीवसुद्धा देऊ शकतो. काहीही करू शकतो. आपल्या भावासाठी जीवावर उदार होऊ शकतो. आपल्या भावावर गाढ विश्वास आहे. जेव्हा त्याला सांगितले जाते की आपण असे करू नये, तर तो समजून जातो की असे जो कोणी करेल त्याला बाहेर काढून टाकतील. आपला मोठेपणा लोकांसमोर दर्शविण्यासाठी काही करू नये. जर महत्त्व दर्शविण्यासाठी मोठे भाषण दिले गेले तर ते अत्यंत आस्थेने आणि प्रेमपूर्वक करावयाचे आहे. जर ते उत्तमतऱ्हेने केले गेले नाही, तर नुसता दिखावटीपणा करून काय फायदा होणार? आजचा दिवस महान आहे. हा भाऊ-बहिणीचा आहे. आपण बहीण-भावांचे नाते कसे काय प्रदर्शित करणार? मला भांडणे ऐकणे आवडत नाही, पण मला माहीत आहे की इथे अनेकप्रकारची कारणे आहेत. मला समजत नाही की लोक याप्रकारे का वागतात? आपण संतजन आहात, पण आपल्याला काय झाले आहे? आपण वेगळे रहाण्याची इच्छा कशी काय करता? मी आपल्याला एक साधे उदाहरण देत आहे. आपल्या घरात एक झाड लावले की जे फक्त घरातच वाढू शकेल, पण जेव्हा उन्हाळ्याची वेळ येते तेव्हां आपण त्याला बाहेर ठेवतो कारण ते बाहेरच्या वातावरणात चांगले वाढते, पण थंडी आली तर रात्रीदेखील ते मलूल झालेले दिसेल. मग नोकर नाराज होऊन म्हणाल की, ‘आता काय करावे?’ मी म्हटले, ‘त्याला आत आणा.’ तो म्हणाला, ‘ते आता वाढणार नाही.’ मी म्हणाले, ‘त्याला आणा.’ आपण त्यापैकी चार-पाच एकत्र ठेवा. तर ती झाडे छान वाढतील. एकामध्ये जी उणीव असेल ती उणीव दुसरा माणूस भरून काढण्यास सहाय्य करील आणि ते सहाय्य उत्स्फूर्त,





त्याचप्रमाणे पूर्णत: नैसर्गिक असेल आणि प्रेम वाढू लागेल. जर तुम्ही दुसऱ्याच्या चुका सुधारत बसाल, तर तुमचीही शक्ती कमी होईल व दुसऱ्याचीही कमी होईल. तेव्हां फक्त आधार देण्याचा प्रयत्न करा. ते घटित होणार. त्यात शक्तीचा आधार असेल आणि ते वाढू लागेल. मला वाटते की फक्त प्रयोगादाखल आपण प्रयत्न करा. जर आपण ४-५ झाडे एकत्र लावली तर सर्व चांगल्या स्थितीत वाढतील. आपण लहान झाडांना एकत्रित दुसऱ्या झाडांसोबत ठेवा. आपण त्यांना वेगळे का ठेवतो? जेव्हा आपल्याकडे छोटे रोप असेल तर लहान झाडांसोबतच ठेवावे. आपण त्यांना वेगळे ठेऊ नये. आपण त्यांना एकत्रित ठेवावे. जर त्यांना वेगवेगळे वाढवण्याचा प्रयत्न केला तर ते कधीही वाढणार नाही. परंतु त्यांना एकत्र सामुदायिकतेत वाढविले तर कसे घटित होते पहा. हे पाहिले काय? आणि हीच सामुदायिकता आहे.

जेव्हा नाजूक स्थितीत सहजयोग असतो तेव्हा आपल्याला अधिक एकत्र येणे आवश्यक आहे. नंतर आपण शक्तिशाली बनू. हे सर्व ठीक होणार. आपल्याला सर्वांशी सहानुभूतीपूर्वक संबंध ठेवावयाचे आहेत. नाहीतर आपली घसरण होते, पण आपण जेव्हा सामूहिकतेत असतो तेव्हा चैतन्य लहरी आपल्याला दृढ आलिंगन देऊन स्वीकारतात. अर्थात सर्व अहंकार व प्रतिअहंकार आणि अन्य बाकी समस्या आपण सामुदायिकतेमध्ये किती जातो त्यावर अवलंबून आहेत, पण मी पाहिले आहे की जेव्हा आपण मोहिनी विद्येने आकर्षित होतो, तेव्हा पुन्हा खाली येतो. पुन्हा अहंकार आपल्यात पूर्णपणे काम करतो. जेव्हा आपल्याला मोहिनी विद्या जाळ्यात पकडते, तिथे आपल्यात स्वातंत्र्य असते पण आपण सामुदायिकतेत आनंद उपभोगू शकत नाही. स्वतंत्रतेत लोक मोठा विचित्रपणा अनुभवतात. त्यानंतर काही जण तपस्वी बनतात. काहीजण मूर्खपणाचे आचरण करतात. काहीजण क्रोधीत होतात. काहीजण सहकार्य करणाऱ्या अधिकाऱ्याप्रमाणे बसतात. मला माहीत नाही. जेव्हा आपण स्वतंत्र असतो, आपण चांगले ताकदवान कधीच वाढणार नाही. आपल्याला सामूहिकता आवश्यक आहे, मला माहीत आहे की आपल्यात असे काही ना काही आहे ते आपल्याला सामूहिकतेपासून वेगळे ठेवते. जर असे झाले तर उत्तम गोष्ट म्हणजे तुम्ही समर्पित होऊन स्वत:लाच शू बीट करा आणि आपल्या विचारातून एखादा मार्ग समोर आला तर त्याप्रमाणे करण्याने सर्व घटित होईल. आजच मला तुम्ही वचन द्यावे. आजच आणि इथेच.

हमाल कुठे आहे? मला तो दिसत नाही. तो इथे आहे का?

योगिनी : आई, त्याला इथे येण्याची परवानगी नाही.

Gavin : मला वाटते, की त्याला इथे येण्याची परवानगी नाही असे आपण म्हटले आहे.

श्रीमाताजी : नाही येणार?

योगिनी : आई, त्याला येण्याची परवानगी दिलेली नाही.

श्रीमाताजी : त्याला परवागनी नाही.

Gavin : मला वाटते आपण त्याला थांबू नये असे सांगितले आहे.

श्रीमाताजी : ठीक आहे. मी सांगितले असेल. मला वाईट वाटते. मी हे केले. मला अशाप्रकारेसुद्धा बोलावे लागते. मला वाईट वाटते, पण आपल्याला माहीत आहे की आपण निवडले गेलेले विशेष आहोत. अवतरणांनी आपल्याकरिता जे तयार केले आहे ते आपण वाचलेत. Milton आपल्याला इंग्रज माणसे माहीत आहेत का? भविष्यसूचकता काय आहे? भौतिकता ब्लॅक मिल्टन प्रमाणे, परमेश्वराप्रमाणे. तिथे असेल. तिथे जवळ स्वत:चे वीर हिरो असतात. त्यांचे स्वत:चे अबोधित वीर लोक आणि सर्वजण संत-महात्मे आहेत आणि तिथे जुन्या गोष्टी खाली जातात असे वाटते. सर्व एकत्रित ठेवा. एकत्रित ठेवा, आपापसात प्रेमाने रहा. आपल्याला ही गोष्ट समजली कां? प्रेम मोहिनी विद्या नाही, परंतु स्वातंत्र्य आहे आणि त्या स्वातंत्र्यात आपल्याला प्रेमाने रहावयाचे आहे. मी आपले स्वातंत्र्य कधीही हिरावून घेऊ इच्छित नाही. हा पाया आहे आणि त्या पायावरच आपण फिरत आहोत.

प्रेम मोहिनी विद्या नाही, परंतु स्वातंत्र्य आहे आणि त्या स्वातंत्र्यात आपल्याला प्रेमाने रहावयाचे आहे.

त्यामुळे आपल्याला मला आज वचन द्यावयाचे आहे आणि आपल्याला भाऊबंदांसाठी प्रार्थना करावयाची आहे. भाऊ-बहिणीचे नाते इथे स्थापित होणार. या इंग्लंडच्या भूमीवर हे जेरूसलेम आहे. जेरूसलेम म्हणजे यात्रा, तीर्थक्षेत्राची भूमी. ही फार महत्त्वाची गोष्ट आहे आणि आपल्याला आश्चर्य वाटेल की हे जेव्हा स्थापन होईल त्यावेळी श्रीलक्ष्मी, श्री लक्ष्मीतत्त्व स्थापन होईल.

श्री महालक्ष्मीची आठ स्वरूपे आहेत. आता या आठ स्वरूपांबाबत वाचायचे आहे. इथे किती आहेत? आता वाचू या.

१. श्री गृहलक्ष्मी : ॐ त्वमेव साक्षात् श्री गृहलक्ष्मी साक्षात् श्री आदिशक्ती नमो नम:

२. श्री आद्यलक्ष्मी : ॐ त्वमेव साक्षात् श्री आद्यलक्ष्मी साक्षात् श्री आदिशक्ती नमो नम:

श्रीमाताजी : आद्यलक्ष्मी म्हणजे महालक्ष्मी. आद्यलक्ष्मी म्हणजे आद्य, आद्य लक्ष्मी हे पहिले नाव आहे. पुन्हा बोला. आता पुन्हा बोला.

योगिनी : ॐ त्वमेव साक्षात् श्री आद्यलक्ष्मी साक्षात् श्री आदिशक्ती साक्षात् श्री भगवती साक्षात् श्रीमाताजी श्री निर्मला देव्यै नमो नम:

श्रीमाताजी : अरे वा दुसरे नाव.

योगिनी : ॐ त्वमेव साक्षात् श्री विद्यालक्ष्मी नमो नम:

३. श्री विद्यालक्ष्मी : विद्या ही सहजयोगाची कला आहे. आपल्याला माहीत आहे ही विद्या आहे. या विद्येला सोडून असलेली सर्व अविद्या आहे. कुंडलिनी कशाप्रकारे उर्ध्वगामी करावी. इतर देवदेवतांना कसे जागृत करावे. स्वत:ला कसे स्वच्छ ठेवावे आणि दुसऱ्यांना कसे स्वच्छ (चैतन्ययुक्त) करावे, याची सर्व माहिती, ज्ञान, शास्त्र जे त्यासंबंधी सर्व सांगितलेले आहे. ही सर्व विद्या आहे. ही लक्ष्मी दयाळू, ज्ञानप्रदान करणारी आहे. ज्ञान देणारी आहे. चेतना, जाणीव, चैतन्यलहरींची अनुभूती हे सर्व आनंददायक आहे. याकरिता ही विद्यालक्ष्मी आपल्याबरोबर असणे, आपल्यात स्थित असणे आवश्यक आहे. ही फक्त ज्ञान देणारीच नाही तर ज्ञानाबरोबर आपल्याला आनंद जाणवला पाहिजे. कधी कधी लोक अशी कृती करतात की उगीचच इकडून तिकडे सर्वप्रकारचा मूर्खपणा करतात. मी भाषण देत असते, बोलत असते, आणि तेव्हां त्यांची कामे चाललेली असतात. या सर्व विवेकशून्य आणि उदासीन करणाऱ्या घटना आहेत. त्यामुळे या पद्धतीने वागणे अयोग्य आहे. मनाची अतिशय उदासीनता दर्शवणारी गोष्ट आहे. आपण याची चिंता, काळजी अजिबात करू नका कारण सहजयोग ही चिंता, दु:ख, काळजी देणारी गोष्ट नाही. हा केवळ एक खेळ, लीला आहे. हा खेळ आनंददायक, माधुर्याचा आहे. सर्वांना आनंदी रहावयाचे आहे. आपण दु:खी राहू नका. हे फारच महत्त्वाचे आहे. जर आपण दु:खी राहिलात तर ही विद्या काहीच कामाची नाही. मी पाहिले आहे की पुष्कळ लोक, पुष्कळ वेळा याप्रकाराने करीत राहतात. आता या प्रकारे आनंद वाटत नाही, पण प्रत्येकानी हे आनंदपूर्णरीतीने कसे करावे हे समजून घ्यावे. आपल्या सर्वांनी आईला नीट पहावयाचे आहे की आई आपल्या हाताची हालचाल कशाप्रकारे करते आणि बोटांची हालचालसुद्धा बघा. एकच दिवस नको. एकदाच बघू नका. प्रत्येक हालचाल मी करीत असताना तुम्ही पहा. कधी कधी आपण आदरशून्यतेने बघता, पण जेव्हा मी आपल्याला कृती करून दाखवित आहे, तर आपण आदरपूर्वक स्वीकारा. श्रीमाताजींचे अनुकरण करा. तर हे काय आहे? ही विद्यालक्ष्मी आहे. लक्ष्मी आनंद आहे. आपल्या आतील ज्ञान, विद्या, आनंद! बघा, एकदा, दोनदा, तीन वेळा पहा.

योगिनी : ॐ त्वमेव साक्षात् श्री.......



श्रीमाताजी : आणि आता तुम्ही सर्वजण म्हणू शकाल ‘ॐ त्वमेव साक्षात्-’

प्रत्येकजण : ॐ त्वमेव साक्षात् श्री विद्यालक्ष्मी साक्षात् श्री आदिशक्ती साक्षात् श्री भगवती साक्षात् श्री माताजी श्री निर्मला देव्यै नमो नम:



श्रीमाताजी : डाव्या स्वाधिष्ठान चक्रासाठी आपल्याला हा मंत्र माहीत आहे.

४. सौभाग्यलक्ष्मी : योगिनी : ॐ त्वमेव साक्षात् श्री सौभाग्यलक्ष्मी साक्षात् श्री आदिशक्ती नमो नम:

श्रीमाताजी : सौभाग्यलक्ष्मी सौ.......भा.......ग्य 'सौभाग्य म्हणजे चांगले भाग्य...नशीब...भविष्य. जी लक्ष्मी आपल्याला चांगले नशीब, भाग्य प्रदान करते, प्रत्येक बाबतीत. ती तुम्हाला चांगले भाग्य.....भविष्य प्रदान करते. भाग्यात-पैसा, तुमची राहण्याची पद्धत, तुमचे अन्य प्रत्येक बाबतीत सर्व आपल्या मार्गात सर्व चांगले भाग्य-हे परमेश्वराकडून चांगले भाग्य दिले जाते. जेव्हा आपल्याला रेसकोर्सकडून पैसा मिळतो, हे वाईट भाग्य कारण हा पैसा नंतर निघून जाणार भविष्यात. काही निर्मिती करावयाची आहे. त्यामुळे परमानंद आणि पुष्कळ काही. हीच सौभाग्यलक्ष्मी हीच सौभाग्य लक्ष्मी आहे. आपण म्हणू या 'सौभाग्य लक्ष्मी' प्रत्येकाने म्हणावे, ओम त्वमेव साक्षात श्री सौभाग्य लक्ष्मी साक्षात श्री आदिशक्ती साक्षात श्री भगवती साक्षात श्री निर्मला देव्यै नमो नम:

५. अमृत लक्ष्मी : श्री माताजी : अमृत लक्ष्मी वाचा.

योगिनी : ॐ त्वमेव साक्षात् श्री अमृत लक्ष्मी नमो नम:

श्रीमाताजी : अ...मृ...त, अमृत म्हणजे अशी गोष्ट की जी कधी मृत होत नाही. मरू शकत नाही. जसे संपत्ती. आत्म्याची संपत्ती. हा आत्मा आहे. त्यामुळे आत्म्याचा आनंद......हे अमृत आहे. ही अमृतलक्ष्मी आहे. आत्म्याचा आनंद म्हणजे अमृत. कधीही नष्ट न होऊ शकणारी.....न मरणारी. बाकी सर्व काही नेहमीच नाश पावते...मरते, परंतु जे काही आत्म्याकडून करण्यात येते, केवळ आत्म्याच्या आनंदासाठी, ती अमृतलक्ष्मी आहे. उदा. 'दुसऱ्यांवर प्रेम करणे. दुसऱ्यांवर प्रेम करणे याचा वेगळा अर्थ आहे. हे प्रतीकात्मक स्वरूपातले आहे. आपण सर्वजण हे समजू शकाल. प्रेम करणे म्हणजेच देणे, त्यात कोणत्याही प्रकारची अपेक्षा न करता आसक्ती न ठेवता देणे (आपल्या मनात त्याच्या बदल्यात काहीही मिळविण्याची इच्छा न बाळगता निर्व्याज्य प्रेम देणे) फक्त देणे व आनंद मिळविणे. सर्वात मोठी आनंदाची गोष्ट म्हणजे चैतन्य लहरी देणे आणि हेच अमृत आहे. चैतन्य लहरी कधी नाश पावत नाहीत, मरत नाहीत, मृत बनत नाहीत. हीच ती अमृतलक्ष्मी आहे.

प्रत्येकजण : ॐ त्वमेव साक्षात् श्री अमृत लक्ष्मी साक्षात् श्री भगवती साक्षात् श्री माताजी श्री निर्मला देव्यै नमो नम:

योगिनी : ॐ त्वमेव साक्षात् श्री गृहलक्ष्मी....

श्रीमाताजी : गृहलक्ष्मी आपल्याला माहीत आहे ती गृहलक्ष्मी.

प्रत्येक जण : ॐ त्वमेव साक्षात् श्री गृहलक्ष्मी साक्षात् श्री आदिशक्ती साक्षात् श्री भगवती साक्षात् श्री माताजी श्री निर्मला देव्यै नमो नमः

श्रीमाताजी : वाहवा!

६. सत्यलक्ष्मी : योगिनी : ॐ त्वमेव साक्षात् श्री सत्यलक्ष्मी नमो नमः

श्रीमाताजी : स...त्य....मी आपल्याला सांगितले आहे की चेतना....(चैतन्य लहरी) ज्या काही आहेत त्या चैतन्य शक्ती प्रदान करतात. तुम्ही तुमची चेतना चैतन्य लहरी वाढवू शकता. आपल्याला सत्य...चैतन्य शक्तीची जाणीव. अनुभव....सत्य.....माहीत आहे. सत्य काय आहे? आपल्याला चेतना माहीत आहे. तुम्ही परमेश्वराचे साधन आहात आणि ती चेतना तुमच्यातून तुमच्याकडून कार्य करते. आपल्याकडे चेतना आहे कारण ती वाहते. आपल्यात नाडीतंत्राद्वारे वहाते आहे. हे सत्य आहे. याच्याबाबतीत आपल्याला जाणीव, अनुभव आहे. दुसरे सत्य कोणते? आपण कोण आहात? आपण आत्मा आहात आणि तिसरे सत्य काय आहे? मी कोण आहे? आणि चौथे सत्य, भगवान.....परमेश्वर कोण आहे? आपली देवी कोण आहे? जेव्हा ती तुमची चेतना शक्ती आहे म्हणजे आपल्याला सत्यलक्ष्मी प्राप्त झालेली आहे.

प्रत्येकजण : ॐ त्वमेव साक्षात् श्री सत्यलक्ष्मी साक्षात् श्री आदिशक्ती साक्षात् श्री भगवती साक्षात् श्री माताजी श्री निर्मला देव्यै नमो नमः

७. भोगलक्ष्मी : ॐ त्वमेव साक्षात् श्री भोगलक्ष्मी साक्षात् श्री आदिशक्ती नमो नमः

श्रीमाताजी : हम...योगिनी-भोगलक्ष्मी.

श्रीमाताजी : भोगलक्ष्मी. भो....ग....भोग म्हणजे ज्यामधून तुम्ही आनंद मिळवता. जसे पूर्ण आनंदाचा सागर सभोवताली आहे. आपण बोटीत बसल्यावर जसे बुडतो तसे कधीच बुडणार नाही. आपण आनंद उपभोगावयाचा आहे. (भोगलक्ष्मी) त्या सागराचा आनंद आपल्याला भोगलक्ष्मीमुळे मिळणार आहे. आत्म्याद्वारे आनंद निर्मिती होते. आपल्याला आत्म्याचा आनंद मिळतो आहे काय? आपल्याला आत्म्याकडून सर्वकाही मिळेल पहा....बोला....फूल पहा. आपल्याला यापासून आनंद उपभोगायचा आहे, केवळ विचारात अडकल्यामुळे आपण आत्म्याचा आनंद मिळवू शकत नाही. जे काही आपण कराल त्यात विचार असेल. त्यामुळे आनंद प्राप्ती होणार नाही. मी अगदी पूर्णपणे तुम्हाला सांगते की मी पूर्ण आनंद घेणारी आहे.

केवळ विचारात अडकल्यामुळे आपण आत्म्याचा आनंद मिळवू शकत नाही.

प्रत्येकजण : ॐ त्वमेव साक्षात् श्री भोगलक्ष्मी साक्षात् श्री आदिशक्ती श्री माताजी श्री निर्मला देव्यै नमो नम:

८. योगलक्ष्मी : योगिनी - ॐ त्वमेव साक्षात् श्री योगलक्ष्मी नमो नम:

श्रीमाताजी : योगलक्ष्मी. श्री लक्ष्मीची शक्ती जी योगशक्ती प्रदान करते. श्री लक्ष्मी आपल्या शक्तीला आधार देते. योगाची शक्ती तुम्हाला अशी चेतना शक्ती देते. योगाच्या सहाय्याने सर्व काही एकत्रित योगलक्ष्मी देते. आपण अफाट समृद्धी, समाधान प्राप्त करतो. योग आपल्याला हवा आहे. जोपर्यंत योग होत नाही तोपर्यंत आपण समाधानात नसतो. योग योगलक्ष्मी देते. म्हणजेच एकप्रकारचे समाधान जे शक्तीमुळे उत्पन्न होते, तीच योगलक्ष्मी आहे. योगापासून प्राप्ती होते. परमानंदाची. लक्ष्मीमुळे आकर्षक गुणांचा अनुग्रह मिळतो. त्यामुले आपल्याला आकर्षक गुण मिळतात. संतांचे गुण. आपल्यात संतांचे आकर्षक गुण असतात. आपण संतांप्रमाणे दिसतो. तुम्ही संतजन आहात. मी विचार करते की हे सर्व आपल्या प्रतिमेतच लिहिलेले आहे. आपण सर्व संतजन आहोत. आपण सर्व परमेश्वराची माणसे आहोत. यात शंकाच नाही. आपण परमेश्वराची माणसे आहोत, अगदी नि:संशय. परंतु आपल्याला या बाजूला आपले चेहरे वळवायचे आहेत म्हणूनच ही योगलक्ष्मी आहे. उदा.ज्याने योगलक्ष्मी मिळविली तो मूर्खपणाने भांडणतंटा करणार नाही. दुसऱ्यांना पाण्यात पहाणारा जेव्हा भांडण करतो तेव्हा मूर्खासारखा वागतो. त्यावेळी त्याच्यामध्ये या योगलक्ष्मीच्या शक्तीची उणीव असते. ज्याच्याकडे योगलक्ष्मी आहे त्याच्याकडे आकर्षक गुण असतात.

प्रत्येकजण : ॐ त्वमेव साक्षात् श्री योगलक्ष्मी साक्षात् श्री आदिशक्ती साक्षात् श्री भगवती साक्षात् श्री माताजी श्री निर्मला देव्यै नमो नम:

श्रीमाताजी : ह्या आठ मार्गाने सर्वांना आकर्षक गुणांचा आशीर्वाद मिळतो. ही सर्व लक्ष्मीची स्वरूपे आहेत. आज त्या सर्वांची मागणी आपल्याला करावयाची आहे. ईश्वर आपल्याला या शक्त्या देवो.

आणखी एक गोष्ट मला सांगावयाची आहे आपण सुरुवात करण्यापूर्वी. श्री लक्ष्मी सर्वांना माहीत आहे. हा भवसागर आहे. लक्ष्मीचे वास्तव्य तिथे आहे. तिथून सर्व नकारात्मकता निघून जाते. देवदेवतांना नकारात्मकता घाबरते. ही देवता संवेदनक्षम आहे. तिला कोणत्याच प्रकारची नकारात्मकता आवडत नाही. नकारात्मकता येते तेव्हा ती निघून जाते. अशाप्रकारे जे लोक संतजन आहेत, ज्यांनी भवसागरात जन्म घेतला ते म्हणतात की ज्यांनी श्री लक्ष्मीला घाबरविण्याचा प्रयत्न केला ते अधार्मिक लोक आहेत ते नशा करणारे आहेत. ज्यांना पिण्याची सवय आहे त्याच्या तिसऱ्या पिढीला लक्ष्मी पूर्णपणे निघून जाते. अगदी पूर्णपणे निघून जाते.

आपण आतादेखील परिणाम पाहू शकाल. जी माणसे एक पेग घेतात आता यावेळी ते पबमध्ये बसतात. पूर्ण रात्रभर, आणि ह्या सर्व गोष्टी त्याच्या पूर्ण कुटुंबात येतात आणि तुमची संपत्ती खाऊन टाकतात.

त्यामुळे तुम्हा सर्वांना समजले पाहिजे की लक्ष्मी संवेदनाक्षम आहे. लक्ष्मी अत्यंत संवेदनक्षम आहे. आत्यंतिक श्रद्धा ज्याच्याकडे आहे त्याच्यासाठी पुष्कळ संवेदनक्षम. धर्माच्याबाबतीत अत्यंत कडवटपणा आला तर लक्ष्मी निघून जाते. धर्मांधता असेल तर ती निघून जाते. ज्या भागात धर्मांधता पसरते तिथे तो प्रदेश गरिबीत अडकतो. सर्वप्रकारची धर्मांधता पूर्ण त्याग करावी. यावेळी पुष्कळ युवा लोकांमध्ये धर्मांधतेबाबत जागरूकता आहे. याबाबत परमेश्वराचे आभार. धर्मांधता जिथे जास्त तिथे घसरण होते. धर्मांधता आली तर लक्ष्मीजींची शक्ती नाहीशी होते आणि त्यावेळी कर्करोग होतो. कर्करोग नशा देणाऱ्या वस्तूमुळे जोरात वाढतो. धर्मांधतेचा त्याग करावा. हा सहजयोगाचा महायोग आहे. आपल्या सर्वांना उभे रहावयाचे आहे. या धर्मांधतेच्या पूर्ण विरोधात. धर्मांधतेच्या विरोधात उभे रहा. उत्क्रांती होईल. लक्ष्मी स्थिर होण्यास हे आवश्यक आहे. धर्मांधतेने जर धर्मात संघर्ष झाला, जर दुसऱ्या धर्माचे महत्त्व कमी झाले तर दुसरा धर्म आपल्याला पाण्यात पाहील. हे सर्व लक्ष्मीतत्त्वाच्या विरोधातले आहे.

त्यामुळे आपल्याला सर्वांना याबरोबर रहायचे आहे. याच्यात प्रगती झाली तर महालक्ष्मी तत्त्वात पोहचता येईल. आता लक्ष्मीजीना शोधणे, प्राप्त करणे, चेतना मिळाल्याने आपल्याजवळ पैसा येईल. तिच्या सहाय्याने आकर्षक गुण मिळतील. आपल्याला परमेश्वर मिळवायचा आहे. आपल्यात नवीन चेतना यावी, त्यामुळे परमेश्वर प्राप्ती होईल, ही महालक्ष्मीची शक्ती आहे. महालक्ष्मीच्या तत्त्वाने संत तत्त्व मिळाले. ती लक्ष्मी नव्हे, महालक्ष्मी आहे. ईश्वर सर्वांना आशीर्वादित करो.

Gavin - ॐ श्री गुरुभ्यौ नमः, ॐ श्री इष्टदेवताभ्यौ नमः

श्रीमाताजी : ठीक आहे. सर्व देवतांची नावे ही परमेश्वराचीच आहेत.

Gavin - ॐ श्री महागणपतये नमः, ॐ श्री सरस्वत्यै नमः, ॐ श्री गुरूभ्यो नमः, ॐ श्री वेदपुरुषाय नमः, ॐ श्री इष्टदेवताभ्यो नमः, ॐ श्री कुलदेवतायै नमः, ॐ श्री ग्रामदेवतायै नमः, ॐ श्री वास्तुदेवताभ्यौ नमः, ॐ श्री स्थानदेवताभ्यौ नमः, ॐ श्रीशचिपुरंदराभ्यौ नमः, ॐ श्री मातृपितृभ्यां नमः, ॐ श्री आदित्यादि नवग्रह देवताभ्यो नमः, ॐ श्री सर्वेभ्यो देवेभ्यो नमः, ॐ श्री सर्वेभ्यो ब्राह्मणेभ्यो नमः, एतद् कर्मः प्रधानदेवताभ्यौ नमः।

# NEW RELEASES

| Date | Title | Place | Lang. | Type | DVD | VCD | ACD | ACS |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 15th Nov.1973 | कुंडलिनी आणि सहजयोग | Pune | M | Sp | | | 272 | 272 |
| 18th Dec.1977 | सत्याचा प्रकाश सुरु झाला | Mumbai | M | Sp | | | 558* | |
| 20th Mar.1978 | We are all seeking | London | E | Sp | | | 572* | |
| 22nd Feb.1979 | सेमिनार | Rahuri | M | Sp | | | 573* | |
| 24th Feb.1979 | विज्ञान म्हणजे स्वत:ला शोधून काढणे | Rahuri | M | Sp | | | 277 | 277 |
| 23rd Mar.1979 | मनुष्य का सूक्ष्म तन्त्र और परम की प्राप्ति | Bordi | H | Sp | | | 250 | 250 |
| 23rd Apr.1979 | Agnya and Lord Christ | London | E | Sp | | | 559* | |
| 11th Jun.1979 | How aspects of God are expressed | London | E | Sp | | | 560* | |
| 15th Jun.1979 | S.Y.Introduction-Higher life | London | E | Sp | | | 574* | |
| 15th Oct.1979 | How Realisation should be allowed to develop | London | E | Sp | | | 052 | 052 |
| 08th Mar.1980 | The Meaning of Sahajyoga | London | E | Sp | | | 575* | |
| 21st Jul.1980 | Auspiciousness | London | E | Sp | | | 053 | 053 |
| 27th Sep.1980 | Lethargy, Most Anti-God | London | E | Sp | | | 051 | 051 |
| 19th Oct.1980 | Spreading Sahajyoga in Europe | London | E | Sp | | | 588* | |
| 27th Oct.1980 | What do we expect from realisation | London | E | SP | | | 589* | |
| 13th Nov.1980 | What makes people happy | Stanford | E | Sp | | | 561* | |
| 20th Nov.1980 | The Myth of Ego | London | E | Sp | | | 576* | |
| 07th Feb.1981 | Mainly Nabhi & Void | Delhi | E | SP | | | 577* | |
| 07th Oct.1981 | The Spirit of America | Houston, USA | E | Sp | | | 578* | |
| 8th Oct.1981 | The Beauty that you are | Texas | E | Sp | | | 579* | |
| 1st Nov.1981 | Diwali Puja-The Mahalakshmi Power & the power of water | London | E | Sp | 385* | | 580* | |
| 31st Dec.1981 | New Year's Eve Talk | London | E | Sp | | | 581* | |
| 30th Jan.1982 | Predictions about Shri Mataji's Advent | Solapur | E | Sp | | | 582* | |
| 29th Mar.1982 | Reality is what it is | London | E | Sp | | | 583* | |
| 07th Apr.1982 | Mother's wedding anniversary | London | E | Sp | | | 593* | |
| 13th May1982 | Left side - Problems of subconscious | Brighton | E | Sp | | | 584* | |
| 21st Jan.1983 | Sahajyoga works by keeping mother pleased | Vaitarna | E | Sp | | | 591* | |
| 28th Aug.1983 | Krishna Puja:Shri Krishna is the ultimate of fatherhood | Switzerland | E | Sp | 369* | | 562* | |
| 17th Feb.1985 | महाशिवरात्री पूजा | Delhi | H | Sp | | | 63 | 63 |
| 26th Mar.1985 | जन्मदिन पूजा | Delhi | H | Sp | | | 585* | |
| 17th Nov.1985 | Diwali Puja : Lighting the lamps of human hearts | Tivoli, Italy | E | Sp/Pu | 386* | | 586* | |
| 17th Dec.1985 | Saptashrungi Puja-Part I & II | Nashik | M/H | Sp | 268* | | 587* | |
| 22nd Dec.1985 | सार्वजनिक कार्यक्रम : स्व चा धर्म (आत्म्याचा धर्म ओळखावा) | Pune | M | PP | 387* | | 391 | |
| 7th Sep.1986 | Shri Ganesh Puja | San Diago | E | Sp/Pu | 370* | | 088 | 088 |
| 14th Aug.1988 | Fatima Bi Puja | Geneva | E | Sp | | | 038 | 038 |
| 8th Aug.1989 | Shri Ganesh Puja:Motherly love & vatsalya | Les Diablere | E | Sp/Pu | 371* | | 035 | 035 |
| 19th Aug.1990 | Shri Krishna Puja | Ipswich | E | Sp/Pu | 368* | | 557* | |
| 25th Mar.1991 | राम-नवमी पूजा | Kolkata | H | Sp | | 027 | 070 | 070 |
| 14th Apr.1991 | Innate Maryadas | Canbera | E | Sp | | | 563* | |
| 17th Apr.1991 | You should not be fundamentalist | Sydney | E | Sp/Pu | 372* | | 564* | |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 15th Sep.1991 | Ganesh Puja:Shree Ganesha & His qualities | Cabella | E | Sp | | | 565* | |
| 09th Feb.1992 | Ganesh Puja : Gravity and Balance | Perth | E | Sp | | | 566* | |
| 13th Feb.1992 | Wear Natural Goods | Canberra | E | Sp | 373* | | | |
| 14th Feb.1992 | You become divine personality | Melbourne | E | Sp | 374* | | 567* | |
| 15th Feb.1992 | Enter the kingdom of God | Melbourne | E | Sp | 375* | | 568* | |
| 02nd Mar.1992 | You have to come to the collectivity | Sydney | E | Sp | 376* | | 569* | |
| 03rd Mar.1992 | Universal understanding | Sydney | E | Sp | 377* | | 570* | |
| 31st May1992 | Shri Buddha Puja:The search for the absolute | Cambridge | E | Sp | | | 591* | |
| 16th Aug.1992 | Shri Krishna Puja : Collective conditioning | Cabella | E | Sp/Pu | 378* | | 571* | |
| 11th Jul.1993 | Devi Puja : Desires, Illusion | Paris | E | Sp | | | 033 | 033 |
| 15th Aug.1993 | Shri Krishna Puja | Cabella | E | Sp | | | 059 | 059 |
| 10th Oct.1993 | Virat Viratangana Puja | Los Angeles | E | Sp | | | 072 | 072 |
| 12th Nov.1993 | Diwali Puja | Moscow | E | Sp | | | 058 | 058 |
| 09th Oct.1994 | Navaratri Puja (innocenceand Enlightened Faith) | Cabella | E | Sp/Pu | 383* | | 479 | |
| 20th Aug.1995 | Krishna Puja : America & False freedom | Cabella | E | Sp/Pu | 379* | | 122 | 122 |
| 01st Oct.1995 | Navaratri Puja (Don't reflect but project your depth) | Cabella | E | Sp/Pu | 384* | | 128 | 128 |
| 14th Apr.1996 | ईस्टर पूजा | Kolkata | H | Sp | | | 137 | 137 |
| 01st Sep.1996 | Krishna Puja : Shri Krishna and Sahaj Culture | Cabella | E | Sp/Pu | 380* | | 145 | 145 |
| 15th Sep.1996 | Ganesh Puja : You must fight for innocence | Cabella | E | Sp/Pu | 381* | | 146 | 146 |
| 08th Jun.1997 | Krishna Puja : Freedom and lack of wisdom | New York | E | Sp/Pu | 382* | | 168 | 168 |
| 25th Mar.1999 | वेळेची हाक | Pune | M | Sp | | | 191 | 191 |
| 25th Mar.00 | हमारी आत्मा क्या चीज़ है | Delhi | H | PP | 388* | | 593* | |

## List of New Release Subtitle for 1st Oct.2011

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 31st Jul.1982 | Dedication Through Meditation<br>(Eng., Hin., Mar., Guj., Tel., Kan.) | Cowley<br>Manor | E | Sp | 146 | | 032 | |

## Bhajan ACD

| | | | |
|---|---|---|---|
| Samadhaan | Sanjay Talwar | 175 | |

**To Order :** You can even place your order through our website : www.nitl.co.in

You can even place your order with NITL through telephone, e-mail, Fax. (Numbers given below)

✦ प्रकाशक ✦

**निर्मल ट्रांसफॉर्मेशन प्रा. लि.**

प्लॉट नं.८, चंद्रगुप्त हौसिंग सोसायटी, पौड रोड, कोथरुड, पुणे - ४११ ०३८. फोन : ०२०- २५२८६५३७, २५२८६०३२, e-mail : sale@nitl.co.in




सहजयोगामध्ये येशू ख्रिस्त आपले मदतनीस आहेत. ....येशू ख्रिस्त आपल्याला या गोष्टींची जाणीव करून देतात की आपण आपले आज्ञा चक्र उघडावे, त्यातून वर यावे. इथे आम्ही त्याला तिसरा डोळा म्हणतो. तिसरा डोळा उघडण्याचा अर्थ हा आहे की आपल्या आज्ञा चक्रावर येशू ख्रिस्त जागृत झाले आहेत.

–प.पू.माताजी श्रीनिर्मलादेवी